**Sandip Foundation's**
**Sandip Institute of Technology & Research Centre, Nashik**
**Department of Electrical Engineering**
**Academic Year 2018-19**

**Report on** Electrical Safety Week 2019

**Event Title:** Electrical Safety Week 2019

**Event Date:** 10 - 12$^{th}$ January 2019

**Event Conduction Duration:** 10.00 am to 5.00 pm

**Event Venue:** Institute of Training and Safety, Eklahare, Nashik

**Event Resource Person Details:** Team of Institute of Training and Safety

**Name of Event Co-ordinator:** Prof.D.S.Badgujar, Prof.A.V.Satpute, SITRC
Mr.Ganesh Chakurkar, Ex.Engineer, ITS.

**No of Participants:** TE - 10 Students

**Event Objective & Outcome:**

- To understand safety aspect while working or repairing any electrical equipments.
- Importance of ELCB, RCCB , Earthing.
- Discharging of Electrical equipment before repairing.
- General guideline for handling any electrical equipments.

divyamarathi.com

**प्रबोधन** • महावितरणच्या एकलहरे येथील सुरक्षा व प्रशिक्षण विभागातर्फे सुरक्षा सप्ताह

# प्रात्यक्षिके, पथनाट्याद्वारे वीज उपकरणांपासून सुरक्षेचे प्रशिक्षण...

**प्रतिनिधी** | नाशिकरोड

विद्युत संच मांडणी सुरक्षित ठेवण्यासाठी घ्यावयाची दक्षता, विजेची उपकरणे हाताळताना घ्यावयाची काळजी, उद्वाहन (लिफ्ट) संदर्भातील नियम व गुणवत्ता याबाबत महावितरणच्या सुरक्षा व प्रशिक्षम विभागाने विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना पथनाट्याद्वारे प्रशिक्षण दिले. तसेच, वीज अपघातप्रसंगी घ्यावयाची काळजी व प्रथमोपचाराबाबत प्रबोधन करण्यात आले.

महावितरणच्या एकलहरे येथील सुरक्षा व प्रशिक्षण केंद्राकडून सुरक्षा सप्ताहानिमित्त मंगळवारी विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्ये, रॅली, चर्चासत्र, बॅनर आणि पत्रकांच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांमध्ये विजेचा सुरक्षित वापर व वीज अपघात टाळण्यासाठी आवश्यक काळजी यासंदर्भात जनजागृती करण्यात येत आहे. मानव संसाधन विभागाचे कार्यकारी संचालक चंद्रशेखर येरमे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा व प्रशिक्षण विभागाकडून सुरक्षा सप्ताहातील प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षण केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक विरू जाडकर आणि विद्युत निरीक्षक हेमंत गांगुर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण केंद्रात सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

प्रशिक्षण केंद्रापासून निघालेल्या रॅलीचा एकलहरे येथील क्रांतिवीर वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पथनाट्य व प्रात्यक्षिकांचा माध्यमातून समारोप झाला. यावेळी कार्यकारी अभियंते अभिमन्यू चव्हाण, देवेंद्र सायनेकर, अनिल नागरे यांच्यासह प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. पथनाट्य व प्रात्यक्षिकांमध्ये प्रशिक्षणार्थी अभियंते तसेच संदीप फाउंडेशन व मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



सुरक्षा सप्ताहानिमित्त महावितरणच्या एकलहरे येथील सुरक्षा व प्रशिक्षण केंद्रात प्रबोधनात्मक रॅली, सुरक्षा सप्ताहानिमित्त एकलहरे येथील सुरक्षा व प्रशिक्षण केंद्राच्या वतीने क्रांतिवीर वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पथनाट्य व प्रात्यक्षिकांचा माध्यमातून वीज सुरक्षेबाबत प्रबोधन करताना अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी.

TE, Electrical Engineering , SITRC Students participated in skit for Electrical safety awareness